MHKO180006542023

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४०/२०२३ मधील**

**निशाणी क्र.३७ खालील आदेश.**

**(गिरीष विनायक घोलकर वि. वंदना बळवंत कामत)**

अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे विद्यमान वकील श्री. वाय.एम.तेली यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नमूद केले आहे की, कै. वासंती दत्तात्रय घोलकर यांना प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार यांच्याव्यतिरीक्त अन्य कोणीही कायदेशीर व सरळ वारस नसतेवेळी गैरअर्जदार यांनी कै. वासंती दत्तात्रय घोलकर ह्या त्यांची मावशी असल्याबाबतचे खोटे कथन करुन प्रस्तुत न्यायालयामध्ये दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२/२०२३ हे प्रकरण दाखल करुन मिळविलेला वारसा दाखला रद्द होवून मिळण्याकरीता प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. अर्जदार यांनी कै. वासंती दत्तात्रय घोलकर यांचा वारसा दाखला मिळण्याकरीता राधानगरी येथील न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणामध्ये प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार यांनी हरकत दाखल केल्यानंतर अर्जदार यांना दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२/२०२३ या प्रकरणाबाबत व त्यामध्ये मंजूर झालेल्या वारसा दाखल्याबाबत प्रथमत: समजले. त्यामुळे, अर्जदार यांनी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले आहे. प्रस्तुत प्रकरण प्रलंबीत असतेवेळी अर्जदार यांनी राधानगरी येथील न्यायालयात प्रलंबीत असलेले किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दिनांक २०.०८.२०२४ रोजी काढून घेतले आहे. त्या अनुषंगाने आणि अर्जदार हेच कै. वासंती दत्तात्रय घोलकर यांचे एकमेव कायदेशीर व सरळ वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणातील मुळ अर्जामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यासाठी अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. मुळ अर्जामध्ये उपरोक्त नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास गैरअर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, मुळ अर्जामध्ये उपरोक्त नमूद दुरुस्ती न केल्यास अर्जदार यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची अर्जदार यांनी विनंती केली आहे.

०३. गैरअर्जदार यांना वेळोवेळी संधी देवून देखील त्यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात येत आहे. गैरअर्जदार यांच्यातर्फे प्रस्तुत अर्जावर युक्तिवाद करण्यात आला नाही.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता, या न्यायालयातील दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२/२०२३ या प्रकरणामध्ये मंजूर करण्यात आलेला वारसा दाखला रद्द होवून मिळण्याकरीता प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यात आल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुत प्रकरण प्रलंबीत असतेवेळी

कै. वासंती दत्तात्रय घोलकर यांचा वारसा दाखला मिळण्याकरीता राधानगरी येथील न्यायालयात अर्जदार यांनी दाखल केलेले दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२३ हे प्रकरण दिनांक २०.०८.२०२४ रोजी काढून घेतल्यामुळे त्या अनुषंगाने आणि अर्जदार हेच कै. वासंती दत्तात्रय घोलकर यांचे एकमेव कायदेशीर व सरळ वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणातील मुळ अर्जामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यासाठी अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार यांच्या पुराव्याकरीता प्रलंबीत असतेवेळी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला असला तरी, प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ अर्जाचा गुणवत्तेवर व संपूर्ण निकाल लावण्याकरीता आणि कार्यवाहीचे बाहुल्य टाळण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. महत्वाचे म्हणजे, अर्जदार यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे गैरअर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व अर्जाच्या स्वरुपामध्ये अमुलाग्र बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. अर्जदार यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.२,०००/– इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम सरकारजमा करण्यात यावी.

२. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत मुळ अर्जामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन मुळ अर्जाची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करावी. तसेच, दुरुस्त अर्जाची एक प्रत गैरअर्जदार यांना द्यावी.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.06.18 16:22:03 +0530

दिनांक : १८.०६.२०२६
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,
कुरुंदवाड.